आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
६ एप्रिल २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतानं आपली अर्थव्यवस्था गेल्या दहावर्षात दुपटीनं वाढवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- रामनवमीनिमित्त राज्यात ठिकठिकाणी शोभायात्रा आणि विविध कार्यक्रमांचं आयोजन

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना

**आणि**

- जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारताच्या हितेश गुलिया याने पटकावलं सुवर्णपदक

<><><><><>

गेल्या दहावर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आज तमीळनाडूत रामेश्वरम इथं समुद्रावरच्या उभ्या उघडता येणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनासह विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. त्यानंतर आयोजित सभेला त्यांनी संबोधित केलं. गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवली आहे, आणि देशाची चारही टोकं जोडण्याच्या उद्देशानं पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी समर्पित प्रयत्न केले आहेत असं ते म्हणाले. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असल्याचं ते म्हणाले, यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर मुंबईतील अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांची उदाहरणं मांडली.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचा रामेश्वरममध्ये जन्म झाल्याचा उल्लेख केला. कलाम यांच्या जीवनातून विज्ञान अध्यात्माशी कशी रितीनं जोडलं गेलं आहे हे दिसून येतं असं ते म्हणाले.

केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळेच गेल्या दहा वर्षात श्रीलंकेच्या ताब्यातल्या ३ हजार ७०० मच्छीमारांची सुटका झाली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज उद्घाटन झालेल्या पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे.

या नव्या रेल्वेपुलामुळे रामेश्वरमची चेन्नईसोबतची दळणवळणीय जोडणी सुधारेल, आणि प्रवासी आणि मालवाहतूकीसह पर्यटन क्षेत्रालाही लाभ होईल, तसंच रोजगार निर्मिती होईल असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. या पुलाच्या निर्मितीत योगदान दिलेल्या अभियंत्यांचंही त्यांनी अभिनंदन केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी या पुलाखालून जाणाऱ्या पहिल्या जहाजाला, तसेच या पुलावरून जाणाऱ्या रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवला. यानंतर प्रधानमंत्री रामेश्वरममधे एका रोड शोमध्ये सहभागी झाले. त्यांनी रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतलं.

रामेश्वरम इथं आयोजित सभेत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते तमीळनाडूमधील ८ हजार ३०० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण देखील झालं.

**<><><><><>**

रामनवमीनिमित्त आज अयोध्येतल्या राम मंदिरात दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. रामलल्लाच्या कपाळावर सूर्याच्या किरणांनी तिलक लावल्यानंतर श्रीरामांना छपन्न भोग अर्थात नैवेद्य दाखवण्यात आला. रामजन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

**नागपुरात** श्रीपोद्दारेश्वर राम मंदिरातून श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा काढण्यात आली. मंदिराच्या प्रांगणात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी श्रीराम, सीतामाई आणि लक्ष्मण यांच्या मूर्तीचं पूजन केलं. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

**नांदेडमध्ये** गाडीपुरा इथल्या श्रीरेणुका माता मंदिरातून शोभा यात्रा काढण्यात आली, यावेळी खासदार अशोक चव्हाण उपस्थित होते. गोंदिया जिल्ह्यातही रामनवमी निमित्त शोभा यात्रा आणि इतर कार्यक्रम झाले.

मुंबईत **वडाळा** इथल्या राममंदिरात भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या.

**नाशिक** मधल्या काळाराम मंदिर आवारात फुलांनी सजवलेल्या पाळण्यात प्रभुरामाची प्रतिमा ठेवून रामजन्म भजन गीत सादर केलं.

श्रीरामनवमीचा उत्सव आज **पुणे** आणि परिसरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. तुळशीबागेतल्या पेशवेकालीन श्रीराम मंदिरात श्रीरामजन्म सोहळा थाटात साजरा झाला. शहरात ठिकठिकाणी शोभायात्रा, मिरवणुका आणि रामकथा सोहळ्याचं आयोजनही करण्यात आलं आहे.

**जालना** शहरासह जिल्ह्यात श्रीरामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. समर्थ रामदास स्वामी यांचं जन्मगाव असलेल्या जांब इथल्या मंदिरातही विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

**हिंगोलीतही** संकटमोचन हनुमान मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. लहान मुलांनी श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांचा देखावा केला होता.

**अकोला** शहरात राजेश्वरमंदिर परिसरापासून बाईक रॅली काढण्यात आली.

**शिर्डी** इथं आज अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींचे फोटो, पोथी आणि वीणा यांची मिरवणूक काढण्यात आली. श्रीसाईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचं विधीवत पूजन करुन ध्वज बदलण्यात आला.

संतनगरी **शेगाव**मध्येही हजारो वारकऱ्यांच्या दिंड्या दाखल झाल्या होत्या त्यानंतर पालखी सोहळा आणि नगरपरिक्रमा करण्यात आली.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही रामनवमी उत्सव साजरा करण्यात आला. मालवण तालुक्यात आचरे इथल्या रामेश्वर मंदिरात आणि कुडाळ तालुक्यात वालावल इथं प्राचीन लक्ष्मी नारायण मंदिरात रामनवमी उत्सव साजरा झाला.

**<><><><><>**

पंढरपूरातल्या चैत्री यात्रेच्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदी पात्रात आज पाणी सोडण्यात आलं. श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचं दर्शन घेण्यापूर्वी भाविक चंद्रभागा नदीत स्नान करतात. भाविकांना नदी पात्रात पवित्र स्नान करता यावं यासाठी नगरपरिषदेच्या बंधाऱ्यातून २५० क्युसेक दरानं पाणी सोडण्यात आलं. २ एप्रिलला सुरु झालेली चैत्री यात्रा १२ एप्रिलपर्यंत सुरु राहणार आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबाद इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

<><><><>

ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत आज पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारताच्या हितेश गुलिया यानं सुवर्णपदक पटकावलं. हितेशनं अंतिम सामन्यात इंग्लंडच्या ओडेल कामारा याचा पराभव केला. भारताच्याच अभिनाश जामवालया यानं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. अंतिम फेरीत अभिनाशला ब्राझीलच्या युरी रीसकडून ० - ५ असा पराभव पत्करावा लागला. याआधी काल पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या मनीष राठोड यानं कांस्य पदकाची कमाई केली.

<><><><>

भारतीय जनता पार्टी आज आपला ४५वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतानाच देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांनीही पक्ष स्थापनादिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त नागपूरमध्ये महाल परिसरातील टिळक पुतळ्याजवळच्या भाजपा महानगर कार्यालयाच्या भूमिपूजन करण्यात आलं. यावेळी

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस केंद्रीय मंत्री नितीन गडकरी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात मिरज इथं युनिक इन्स्टिट्यूट ऑफ क्रिटिकल केअर या रुग्णालयाचं लोकार्पण राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते झालं. या रुग्णालयामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि परराज्यातून येणाऱ्या रुग्णांना मोठा लाभ होणार आहे. सर्व आधुनिक उपचारांसाठी आवश्यक जागतिक दर्जाची यंत्रे आणि साधने येथे उपलब्ध आहेत. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांकडून इथं रुग्णांवर उपचार केले जाणार असल्यानं आपत्कालीन परिस्थितीतदेखील रुग्णांना त्वरित आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळणार आहे.

"वैद्यकीय क्षेत्रामध्ये खूप चांगल्या प्रगतीची सुविधा आणि विविध प्रकारची माध्यम उपलब्ध झाली पाहिजेत. लोकांना आरोग्याची दर्जेदार सेवा दिली पाहिजे. ती सेवा दर्जेदार होत असताना शासकीय आणि खाजगी तत्त्वावर होत असताना ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनं प्रोत्साहन दिलं पाहिजे." असं आरोग्यमंत्री यावेळी म्हणाले.

खासदार विशाल पाटील, आमदार सुरेश खाडे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत **चंद्रपूर** जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातलं सादागड-हेटी हे गाव राज्यातलं पहिलं आदिवासी सौर ग्राम ठरलं आहे. केवळ २० दिवसांत सर्व अडचणी दूर करून महावितरण -जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनानं या गावात शून्य वीजबिल साध्य केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

इफ्कोच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे नॅनो युरीया आणि नॅनो डीएपीनं जगभरात भारताची प्रतिमा उजळली असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज गांधीनगरमधल्या कलोल इथं इफ्कोच्या सुवर्ण जयंती

महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. इफ्कोच्या आधुनिक प्रयोगशाळांतल्या संशोधनाचा फायदा शेतांपर्यंत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकणामधे तुरळक ठिकाणी पाऊस झाला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान चंद्रपूर इथं ४१ पूर्णांक ८ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//